# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 103 व 104 अन्वये
**{लेखा व वित्त विभाग}** सन 2023-2024 चे सुधारित व कलम 95,96,100 च्या तरतुदीनुसार सन 2024-2025 चा प्रस्तावित अर्थसंकल्प दोन भागात तयार करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन आदेश क्रमांक एम सी ओ 2020/प्रक्र 71/(भाग2) नवि 14 मंत्रालय मुंबई दिनांक 3 मार्च 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1अ) व 1 (ब) येथील तरतुदीनुसार दिनांक 04/03/2022 रोजी मुदत संपलेल्या नागपूर महानगरपालिका येथे प्रशासकपदी आयुक्त, महानगरपालिका यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानुसार महानगरपालिका अधिनियमातील कलम 452 (2) (क) अन्वये असलेल्या अधिकारानुसार सर्व समित्यांचे अधिकार व कर्तव्ये महानगरपालिका विसर्जनाच्या कालावधीत मा. आयुक्त तथा प्रशासक यांना आहे. त्यामुळे नागपूर महानगरपालिकेचे सन 2023-2024 चे सुधारीत व सन 2024-2025 चे प्रस्तावित (अ व क) तसेच परिवहन समितीव्दारा प्रस्तावित अर्थसंकल्प "**ब**" सादर केल्याप्रमाणे अ, क व ब अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 95 अन्वये स्थायी समितीस सादर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.
टिप : सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 796/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 29/02/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार प्रमुख लेखा व वित्त अधिकारी, लेखा व वित्त विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 103 व 104 अन्वये सन 2023-2024 चे सुधारित व कलम 95,96,100 च्या तरतुदीनुसार सन 2024-2025 चा प्रस्तावित अर्थसंकल्प दोन भागात तयार करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन आदेश क्रमांक एम सी ओ 2020/प्रक्र 71/(भाग2) नवि 14 मंत्रालय मुंबई दिनांक 3 मार्च 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1अ) व 1 (ब) येथील तरतुदीनुसार दिनांक 04/03/2022 रोजी मुदत संपलेल्या नागपूर महानगरपालिका येथे प्रशासकपदी आयुक्त, महानगरपालिका यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानुसार महानगरपालिका अधिनियमातील कलम 452 (2) (क) अन्वये असलेल्या अधिकारानुसार सर्व समित्यांचे अधिकार व कर्तव्ये महानगरपालिका विसर्जनाच्या कालावधीत मा. आयुक्त तथा प्रशासक यांना आहे. त्यामुळे नागपूर महानगरपालिकेचे सन 2023-2024 चे सुधारीत व सन 2024-2025 चे प्रस्तावित (अ व क) तसेच परिवहन समितीव्दारा प्रस्तावित अर्थसंकल्प "**ब**" सादर केल्याप्रमाणे अ, क व ब अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 95 अन्वये स्थायी समितीस सादर करण्यात आले. अंतिम मंजुरी करीता महानगरपालिकेस सादर करण्याची शिफारस करण्यास मंजुरी प्रदान केली.